महाराष्ट्र टाइम्स

Tuesday 13th Oct.,2020, Nagpur

# गुडघ्याच्या वातासाठी वरदान : रोबोटिक नी रिप्लेसमेंट

**१. भारतात संधिवात किती सामान्य आहे?**

उत्तर : भारतातील १५ टक्के म्हणजेच १८० दशलक्ष लोकांना संधिवाताचा त्रास आहे. ही स्थिती मधुमेह व उच्च रक्तदाबापेक्षाही सामान्य आहे.

**२. या आजाराने ग्रस्त होण्याचे सामान्य वय किती आहे?**

उत्तर : सामान्यता ५५-६० वर्षे वयाच्या महिला आणि ६५-७० वर्षे वयाचे पुरुष.

**३. संधिवातामुळे मुख्यतः कोणते सांधे प्रभावित होतात?**

उत्तर : संधिवाताने सर्वप्रथम अंगठ्याचे कोर्पोमेटाकार्पल जॉईंट प्रभावित होतात, पण त्यावर शरीराचा भार नसल्याने त्याचा फारसा त्रास होत नाही. मात्र पायांवर शरीराचा पूर्ण भार असल्यामुळे गुडघ्याचे सांधे लवकरच प्रभावित होतात व दुखू लागतात.

**४. गुडघ्याचा संधिवात हा आजार आहे का?**

उत्तर : संधिवात ही सांधे जुनाट होण्याची एक सामान्य प्रक्रिया आहे. जसेजसे आपले वय वाढेल आपणास या ना त्या प्रकारे सांध्यांच्या समस्या जाणवतील. महिला या आजाराच्या लवकर शिकार होतात. दुसऱ्या प्रकारच्या संधिवाताला रुमटॉइड ऑर्थायटीस (गठीयावात) असे म्हणतात. ही आजाराची असामान्य स्थिती आहे. ज्याचे लवकर निदान व उपचार करणे गरजेचे आहे.

**५. गुडघ्याच्या संधिवाताची लक्षणे कोणती ?**

उत्तर : वेदना होणे हे सर्वसामान्य लक्षण आहे. चालताना त्रास होणे, दैनंदिन कामे करताना जसे, खुर्चीवरून उठणे, कारमधून बाहेर पडणे त्यावेळी त्रास होणे आणि शेवटी गुडघे वाकण्यास (व्यंग) सुरुवात होते. मंदिरात दर्शनाला जाणे किंवा किटी पार्टीला जाणे अवघड होऊन जाते.



डॉ. मुकेश लड्डा

**६. गुडघ्यांच्या संधिवाताला प्रतिरोध किंवा उशीर कसा करावा?**

उत्तर : 'काळजी ही उपचारापेक्षा उत्तम' या उत्कीप्रमाणे कमी वयातच शारीरिक व्यायाम, वजन वाढीवर नियंत्रण ठेवणे, सकस आहार घेणे शरीर लवचिक ठेवणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, गुडघेदुखी चारआठवड्यांपेक्षा जास्त लांबल्यास लवकर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**७. कॅल्शियम किंवा व्हिटॅमिन-डी ची काय भूमिका आहे ?**

उत्तर : होय, कॅल्शियम व व्हिटॅमिन-डी चे शरीरातील योग्य प्रमाण गुडघे, हाडे, स्नायू, नसा व संपूर्ण आरोग्यासाठी हितकारकच आहे; ज्यामुळे तुम्ही तंदुरुस्त राहता. कॅल्शियमचा दररोज १००० मिलीग्राम डोस व व्हिटॅमिन -डी आठवड्यातून एकदा ६०-के डोस घ्यावा.

**८. गुडघ्यांच्या संधिवातावर काय उपचार आहेत ?**

उत्तर : गुडघ्यांच्या संधिवाताच्या सुरुवातीच्या टप्प्यात काही औषधे, इंजेक्शन्स व शारीरिक व्यायाम फायदे देतात. याव्यतिरिक्त तुम्हाला जीवनशैलीत काही बदल करणे आवश्यक आहे. जसे: पाय दुमडून न बसावे, पायाचा गुणाकार टाळावा, वजन वाढू न देणे, दररोज पायी फिरणे, व्यायाम, योगासने यांचा अंतर्भाव करावा.

**९. गुडघे बदलण्याशिवाय मुळ गुडघे टिकवून ठेवण्यासाठी काही सर्जरी आहेत का?**

उत्तर : होय, एक सर्जरी आहे ज्याला ' हाय टी बीयल ऑस्टीओटोमी' म्हणतात. या ऑपरेशनमध्ये डॉक्टर व्यंग दुरुस्त करतात आणि वजन तोलणारा अक्ष बदलतात. पण ही सर्जरी फक्त संधिवाताच्या सुरवातीच्या टप्प्यातच शक्य आहे.

**१०. गुडघे बदलीच्या कोणत्या सर्जरी उपलब्ध आहेत ?**

उत्तर : अर्ध गुडघे बदली व पूर्ण गुडघे बदली अशा दोन सर्जरी उपलब्ध आहेत . गुडघ्याच्या काही भागात क्षती जास्त आहे किंवा पूर्ण गुडघाच क्षतीग्रस्त आहे यावर ही सर्जरी अवलंबून आहे.

**११. गुडघे बदलीसाठी सर्जरीच्या कोणत्या पद्धती उपलब्ध आहेत ?**

उत्तर : **११.१ पारंपरिक गुडघे रोपण** सामान्यतः सर्वच रुग्णालयात अस्थी तज्ज्ञांकडून ही सर्जरी केली जाते. याचे चांगले परिणाम मिळतात या पद्धतीत २०टक्के रुग्ण असंतुष्ट असतात. यामध्ये कनव्हेंशनल जिग्स वापरले जाते.

**११.२ संगणकीकृत गुडघे रोपण** : ही सर्जरी पारंपरिक गुडघे रोपण सर्जरीसारखीच आहे; परंतु यामुळे गुडघ्यांची रचना चांगल्या प्रकारे समजण्यास मदत मिळाली आहे. डॉक्टर्स या तंत्रज्ञानाचा वापर करून चांगले परिणाम देत आहेत व रुग्णही आनंदी आहेत.

**११.३ रोबोटिक असिस्टेड नी रिप्लेसमेंट सर्जरी** : गुडघेरोपणासाठी हे अत्यंत आधुनिक तंत्रज्ञान आहे. ही सर्जरी अचूकपणे पार पडते.



**१२. रोबोटिक असिस्टेड नी रिप्लेसमेंट सर्जरी बद्दल आणखी माहिती द्या?**

उत्तर : मानवी गुडघ्यात फिमर, टिंबीया, पटेल्ला अशा तीन हाडांचा जोड असतो, पण त्यांचे कोन प्रत्येक व्यक्तीसाठी वेगळे असतात. रोबोटिक तंत्रज्ञानामुळे प्रत्येक व्यक्तीच्या गुडघ्यातील नेमका कोन ओळखण्यास मदत होते. तसेच क्षतीग्रस्त हाड कापण्यासाठी या तंत्रज्ञानाची मदत होते. हाड कापणीनंतर त्या जागी रुग्णाच्या गुडघ्याच्या ठेवणीनुसर कृत्रिम सांधे अचूकपणे बसविता येतात.

**१३. रोबोटिक असिस्टेड नी रिप्लेसमेंट सर्जरीचे फायदे कोणते ?**

उत्तर : जेव्हा तुम्ही शर्ट विकत घेता तेव्हा तुम्ही तुम्हाला नेमका कोणत्या मापाचा व प्रकारचा शर्ट शोभून दिसतो ते पाहता. त्याच प्रकारे रोबोटिक असिस्टेड नी रिप्लेसमेंट सर्जरीशिवाय तुमच्या गुडघ्यांसाठी अचूक तंतोतंत व गुडघ्याच्या मापाचा सर्वोत्कृष्ट कृत्रिम गुडघा बसविणे शक्य होऊ शकत नाही.

**१४. रोबोटिक असिस्टेड नी रिप्लेसमेंट सर्जरीचे इतर कोणते फायदे आहेत ?**

क) लिगामेंट अचूक संतुलन
ख) सामान्य हालचालींना लवकर सुरुवात
ग) या सर्जरीनंतर मध्यम किंवा खुप कमी फिजीओथेरपी ची गरज पडते
घ) रुग्णालयात कमी दिवस थांबावे लागते
च) सर्जरीच्या दोन दिवसानंतर रुग्ण वॉकर / काठी न वापरता स्वतःच चालू शकतो
छ) सर्जरीत रक्ताचे नुकसान कमी झाल्यामुळे रक्त द्यावे लागत नाही
ज) सर्जरीनंतर वेदना कमी होतात, त्यामुळे रुग्ण लवकर बरा होतो
झ) कृत्रिम गुडघा बसवल्यावर तो नैसर्गिक असल्यासारखाच वाटतो
ट) सर्जरीच्या एक महिन्यानंतर जगात कुठेही प्रवासाला जाता येते व गुडघ्यांची वेदनाशून्य हालचाल करता येते

**१५. कोणत्या केंद्रावर रोबोटिक असिस्टेड नी रिप्लेसमेंट सर्जरी उपलब्ध आहे ?**

उत्तर : संपूर्ण मध्य भारतातील एकमेव आर. एन. एच. हॉस्पिटल, धंतोली, नागपूर या रुग्णालयात ही सुविधा/ सर्जरी उपलब्ध आहे.

**१६. रोबोटिक असिस्टेड नी रिप्लेसमेंट सर्जन कोण आहेत ?**

उत्तर : डॉ. मुकेश लड्डा हे मध्य भारतात फक्त एकच सर्जन आहे जे ही सर्जरी करतात. एका वर्षात १६५ पेशंटनी रोबोटिक नी रिप्लेसमेंट चा फायदा घेतला.

**१७. आजच्या या परिस्थितीत नी रिप्लेसमेंट करता येते का?**

उत्तर : नॉन कोव्हिड हॉस्पिटलमध्ये ही सर्जरी पूर्णपणे सुरक्षित आहे. या हॉस्पिटलमध्ये पूर्णपणे कोव्हिडची खबरदारी घेऊन ही सर्जरी होत आहे.